नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे | Year - 2nd | अंक - १२८ | Issue - 128 | वार मंगळवार दि. २४ सप्टेंबर २०२४ | Blow- Tuesday Date 24 September 2024 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amout - 4 /- Rs | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

अक्षय शिंदेचा पोलीस चकमकीत मृत्यू

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

मुंबई : बदलापूर शाळा लैंगिक अत्याचार प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदेने पोलिसांवर गोळीबार केला आहे. ठाणे क्राइम ब्रॅचच्या टीमकडून त्याला चौकशीसाठी घेऊन जात असताना ही घटना घडली. यावेळी अक्षयने पोलिसांजवळील बंदूक हिसकावरून त्यांच्या दिशेने गोळीबार केला. यावेळी प्रत्युत्तरादाखल पोलिसांनीही गोळीबार केला. या गोळीबारात या आरोपी अक्षय शिंदे ठार झाल्याची माहिती आहे. तसेच सहायक पोलिस निरीक्षक निलेश मोरे जखमी झाले आहेत.

ठाणे क्राइम ब्रॅचच्या टीमने आज अक्षयला तळोजा जेलमधून ताब्यात घेतले होते. तसेच त्याला दुपारच्या सुमारास घटनास्थळाची पाहणी करण्याकरीता घेऊन असताना मुंब्रा बाह्यवळण मार्ग येथे पोहोचताच अक्षयने पोलिसांजवळील बंदूक हिसकली आणि पोलिसांच्या दिशेने गोळीबार केला. प्रत्युत्तर म्हणून पोलिसांनीही त्याच्या दिशेने गोळीबार केला. पोलिसांच्या गोळीबारात अक्षय जखमी झाला. त्यानंतर त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. हा संपूर्ण प्रकार पोलिसांच्या वाहनातच घडला.

या गुन्ह्याचा तपास करण्यासाठी ठाणे पोलिसांची क्राईम ब्रॉँच टीमने त्याला ताब्यात घेतले होते. सोमवारी सायंकाळी पोलीस त्याला तळोजा कारागृहातून चौकशीसाठी घेऊन जात असताना त्याने पोलीस अधिकाऱ्याची बंदूक हिसकावून पोलिसांवर गोळ्या झाडण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी पोलिसांनी स्वसंरक्षणार्थ अक्षयवर गोळीबार केला यात तो ठार झाला.

काही दिवसांपूर्वीच बदलापूर येथील एका शाळेत दोन चिमुकल्या विद्यार्थिनीवर अत्याचार झाल्याचे प्रकरण समोर आले होते. या घटनेनंतर बदलापूरमध्ये नागरिकांनी रेल्वे रुळावर उतरून आंदोलन केले होते. या आंदोलनामुळे तणावाचे वातावरण होते. त्यानंतर अक्षय शिंदे याला अटकही करण्यात आली होती. या आंदोलनाची दखल घेत राज्य शासनाने या प्रकरणाचा तपास करण्यासाठी एसआयटी नेमली होती. या एसआयटीच्या टीमने या प्रकरणाचा तपास करून कल्याण न्यायालयात आरोपपत्र दाखल केले होते. असे असतानाच अक्षय शिंदे याच्या दुसऱ्या पत्नीने दिलेल्या तक्रारीच्या आधारे पोलिसांनी त्याच्या विरोधात अनैसर्गिक लैंगिक संबंध प्रस्थापित केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला होता.

दरम्यान, या घटनेनंतर आरोपी अक्षय शिंदेच्या आईने टीव्ही ९ वृत्तवाहिनीला प्रतिक्रिया दिली. माझा पोरगा असं काही करणार नाही (बदलापूरच्या घटनेबाबत) माझा पोरगा एकदम गरीब होता, अशी घाण सवय त्याला लावलेली नाही, माझा पोरगा फटाकाही वाजवत नाही, तो गाड्यांना घाबरायचा, असे त्या म्हणाल्या.

सरपंच आणि उपसरपंचांच्या मानधनात वाढ, मंत्रीमंडळाचा निर्णय

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

मुंबई : सरपंच आणि उपसरपंच यांचे मानधन दुप्पट केले असून, ग्रामसेवक व ग्राम विकास अधिकारी हे एकच पद करण्याबाबत आजच्या मंत्रीमंडळ बैठकीत निर्णय घेण्यात आल्याची माहिती ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांनी दिली. आज मुंबईत पार पडलेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत ग्रामपंचायती संबंधित दोन मोठे निर्णय घेण्यात आले. राज्यातील सरपंच व उपसरपंच यांचे मानधन दुप्पट करण्यात आले असून ज्या ग्राम पंचायतीची लोकसंख्या २००० पर्यंत आहे त्या सरपंचाचे मानधन रु. ३००० वरुन रु. ६०००. तर उपसरंपचाचे मानधन १००० रुपये वरुन २००० रुपये करण्यात आले आहे. ज्या ग्रामपंचायतीची लोकसंख्या २००० ते ८००० पर्यंत आहे त्या सरपंचाचे मानधन रु. ४००० वरुन रु. ८०००. तर उपसरपंचाचे मानधन १५०० वरुन रु. ३००० करण्यात आले आहे. ज्या ग्रामपंचायतींची लोकसंख्या ८००० पेक्षा जास्त आहे त्या सरपंचाचे मानधन ५००० रु. वरुन १०,००० रु. तर उपसरपंचाचे मानधन २००० रुपये वरुन ४००० रुपये करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे अशी माहिती मंत्री गिरीश महाजन यांनी दिली.

राज्याच्या तिजोरीवर वाढला ११६ कोटी रुपयांचा अतिरिक्त भार

या मानधनवाढीपोटी राज्य शासनावर वार्षिक ११६ कोटी रुपयांचा आर्थिक भार येणार आहे. राज्यातील कार्यरत ग्रामसेवक व ग्रामविकास अधिकारी हे एकच पद करण्यास आजच्या मंत्रीमंडळ बैठकीत निर्णय घेण्यात आला आहे. ग्रामविकास विभागाने राज्यातील ग्रामपंचायतींना १५ लाख रूपयापर्यंतची विकासकामे ग्रामपंचायत एजन्सी म्हणून करण्याचा निर्णय घेतलेला आहे. या निर्णयामुळे ज्या ग्रामपंचायतीचे वार्षिक उत्पन्न ७५ हजार रूपयांपर्यंत आहे त्या ग्राम पंचायतींना १० लाख रूपयांपर्यंतची. ज्या ग्रामपंचायतीचे वार्षिक उत्पन्न ७५ हजारापेक्षा जास्त आहे त्या ग्राम पंचायतींना १५ लाखापर्यंतची कामे ग्रामपंचायत एजन्सी म्हणून करता येतील. या निर्णयाची अंमलबजावणी करताना १० लाखांच्यावरील कामाकरिता ई-निविदा पध्दतीचा अवलंब करणे अनिवार्य आहे. ग्रामविकास विभागाने ग्रामीण गृहनिर्माण

(पान २ वर...)

गृहविभागाने दाखवलेला हलगर्जीपणा संशयास्पद

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

मुंबई : बदलापूर अल्पवयीन मुलींवरील अत्याचार प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदे याचा काहीवेळापूर्वी मृत्यू झाला आहे. गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अधिकृतरित्या बातमीला दुजोरा दिला आहे. तळोजा कारागृहातून अक्षयला तपासासाठी बेलापूरला नेत असताना एन्काऊंटरचा प्रकार घडला आहे. मुंब्रा हायवेनजीक घटना घडली आहे.

बदलापूर येथे दोन चिमुरड्यांवर झालेल्या अन्यायाला न्याय मिळण्यासाठी कायद्याच्या योग्य चौकटीतून फाशी झालीच पाहीजे होती. परंतू घटनेतील मुख्य आरोपीला स्थलांतरीत करताना गृह विभागाने दाखवलेला हलगर्जीपणा संशयास्पद आहे. भविष्यात अशा निंदनीय कृत्याची कल्पनाही कोणाच्या मनाला शिवणार नाही यासाठी कायद्याचा धाक घालण्यात शासन दुर्बल ठरलंय, असे भासते. या घटनेच्या सखोल चौकशीतून वस्तूस्थिती समोर येणं अपेक्षित आहे अशी प्रतिक्रिया शरद पवार यांनी दिली आहे.

अमित शहा राज्याच्या दौऱ्यावर; मोदी गुरुवारी पुण्यात

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

मुंबई : विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम लवकरच जाहिर होण्याची शक्यता असल्याने वातावरणनिर्मितीसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांचे राज्यातील दौरे वाढले आहेत.

लोकसभा निवडणुकीत राज्यात फटका बसल्याच्या पार्श्वभूमीवर विधानसभा निवडणुकीच्या तयारीचा आढावा आणि पदाधिकारी तसेच कार्यकर्त्यांमध्ये विश्वास निर्माण करण्यासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा हे मंगळवारपासून दोन दिवसांच्या राज्याच्या दौऱ्यावर येत आहेत. महायुतीतील जागावाटपावरही चर्चा होण्याची शक्यता आहे. मंगळवारी शहा हे नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर येथे पक्षाच्या पदाधिकाऱ्यांशी संवाद साधणार आहेत. उद्या रात्री उशिरा संभाजीनगरमध्ये पक्षाच्या काही प्रमुख पदाधिकाऱ्यांशी शहा हे विधानसभा निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेणार आहेत. बुधवारी नाशिक आणि कोल्हापूरमध्ये अमित शहा हे पदाधिकाऱ्यांशी संवाद साधणार आहेत. चारही ठिकाणी पक्षाचे प्रमुख पदाधिकारी, जिल्ह्यातील नेते, बूथ पातळीवरील पदाधिकाऱ्यांना निमंत्रित करण्यात आले आहे. चारही ठिकाणी सुमारे दोन हजार पदाधिकाऱ्यांना निमंत्रण देण्यात आल्याचे सांगण्यात आले.



अमित शहा हे महाराष्ट्र दौऱ्यात महायुतीतील जागावाटपाच्या संदर्भात पक्षाच्या नेत्यांशी चर्चा करणार आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार हे दोघे शहा यांची भेट घेण्याची शक्यता आहे. भाजपच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साह आणि विश्वासाची भावना निर्माण करण्याचा प्रयत्न आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे गुरुवारी पुण्यात येणार आहेत. शिवाजीनगर ते स्वारगेट भूमिगत मार्गाचे लोकार्पण, स्वारगेट ते कात्रज भूमिगत मेट्रोचे भूमिपूजन आणि सोलापूर विमानतळाचे उद्घाटन असे कार्यक्रम मोदी यांच्या हस्ते पार पडणार आहेत.

थोडक्यात

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा सोलापूर जिल्हा दौरा

सोलापूर (जिमाका) : राज्याचे उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री श्री. अजित पवार हे मंगळवार दि.२४ सप्टेंबर २०२४ रोजी सोलापूर जिल्हा दौऱ्यावर येत असून त्यांचा दौरा पुढील प्रमाणे. दि.२४ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी १० वा. यशवंतराव चव्हाण महाविद्यालय मैदान हेलिपॅड, करमाळा येथे आगमन. नंतर करमाळा विधानसभा मतदारसंघातील विविध कार्यक्रमास उपस्थिती , सकाळी १०.१५ वा. कमलाई मंदिर येथे आगमन व दर्शन नंतर बाईक रॅलीस सुरवात -स्थळ देवीचा माळ, करमाळा. नंतर तहसिल कार्यालयाचे भूमिपुजन स्थळ मावलाली माळ ,करमाळा . नंतर स्वागत समारंभ स्थळ देवळाली ग्रामपंचायत ता. करमाळा. नंतर हॅम रोड भूमिपूजन स्थळ झरे फाटा ता. करमाळा, दुपारी १२.४० वाजता राधेशाम मंगल कार्यालय, झरे फाटा ता. करमाळा येथे आगमन व जनसन्मान यात्रा - लाडक्या बहिणींशी संवाद. त्यानंतर ०१.१५ वाजाता राखीव. दुपारी ०३ वाजता यशवंतराव चव्हाण महाविद्यालय मैदान हेलिपॅड, करमाळा येथे आगमन व हेलिकॉप्टरने बारामती कडे प्रयाण.

किल्ले रायगड परीसरात ढगफुटीसदृष्य पाऊस

अलिबाग: मागील आठवडाभरापासून विश्रांती घेतलेल्या पावसाने आज सकाळपासून रायगड जिल्ह्यात हजेरी लावली. आज संध्याकाळच्या सुमारास दक्षिण रायगडमध्ये जोरदार पाऊस झाला. किल्ले रायगड आणि निजामपूर परीसरात झालेल्या ढगफुटी सदृष्य पावसाने नागरीकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले होते. संध्याकाळी चार वाजण्याच्या सुमारास महाड, माणगाव, पोलादपूर या तालुक्यांमध्ये जोरदार पावसाला सुरूवात झाली. ढगांचा गडगडाट आणि वीजांच्या कडकडाटासह जोरदार पाऊस बरसला.

डाउनलोड करणे किंवा पाहणे पॉक्सो कायद्यानुसार गुन्हा : सर्वोच्च न्यायालय

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

मुंबई : चाइल्ड पोर्नोग्राफी डाउनलोड करणे आणि पाहणे हा पॉक्सो कायदा आणि आयटी कायद्यानुसार गुन्हा ठरत नाही हा मद्रास उच्च न्यायालयाचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने रद्द केला आहे. सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड आणि न्यायमूर्ती जे बी पार्डीवाला आणि मनोज मिश्रा यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला आहे. चाइल्ड पोर्नोग्राफी डाऊनलोड करणे आणि पाहणे हे दोन्ही कायद्यांतर्गत दंडनीय गुन्हे आहेत यावर सर्वोच्च न्यायालयाने जोर दिला.

मद्रास उच्च न्यायालयाच्या निर्णयाला आव्हान देणारी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली होती. याचिकेवर झालेल्या सुनावणीदरम्यान सर्वाच्च न्यायालयाने आज निर्णय जाहीर

(पान २ वर...)

धनगर समाजाचा अक्कलकोटला चक्का जाम आंदोलन

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

अक्कलकोट/तालुका प्रतिनिधी : सकल धनगर समाज बांधवांच्या वतीने सोमवारी अक्कलकोट येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात धनगर समाजाचा एस. टी. प्रवर्गात समावेश करुन त्याची अंमलबजावणी करण्यासाठी रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. यावेळी शहरातील व तालुक्यातील धनगर समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. रास्ता रोको आंदोलनात मेंढ्या घेऊन मेंढपाळ बांधव सहभागी झाले होते. यावेळी तहसीलदार यांच्या वतीने उत्तर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राजेंद्र टाकणे यांनी निवेदन स्वीकारले.

Galaxy A34 5G

यावेळी माजी गृहराज्यमंत्री सिध्दाराम म्हेत्रे, सुनील बंडगर,अविनाश मडिखांबे, रमेश पाटील, आनंद तानवडे,बाळासाहेब मोरे, मल्लिकार्जुन पाटील, आनंद बुक्कानुरे, सुनिल कटारे, मल्लिनाथ पाटील, अशपाक बळोरगी, महेश जानकर, बाबासाहेब पाटील, मल्लिकार्जुन काटगाव, अनिल बर्वे, दत्तात्रय हिळ्ळी, सुभाष पुजारी,दत्तात्रय माडकर, सुर्यकांत बाचके, गुणवंत लवटे, महादेव करमल, विठ्ठल खताळ,दाजी कोळेकर, संतोष शिंदे, शिवयोगी पुजारी, विश्वनाथ बंदिछोडे, महादेव निंबाळ, रेवणसिध्द शेरी, रवी सलगरे, औदुंबर बंडगर, सैदप्पा इंगळे, अजय मुकणार, प्रकाश गडगडे, विजय पोतेनवरु यांच्या सह

(पान २ वर...)

संकल्पभुमी स्मारकाला १० कोटीचा निधी केंद्रसरकारकडुन मिळवुन देणार

केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले

बडोद्यातील संकल्पभुमी येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे भव्य स्मारक लवकरच उभारले जाईल

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

बडोदा : महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बडोदा संस्थानातील नोकरी सोडल्यानंतर २३ सप्टेंबर १९१७ रोजी सयाजी गार्डन मधील वृक्षाखाली बसुन अस्पृश्यता निवारणाचा संकल्प केला होता. समाजाला न्याय हक्क मिळवुन देईल. समजात समता स्थापन करण्याचा संकल्प केला होता. त्या ऐतिहासीक स्थळाला संकल्प भुमि म्हणून आंबेडकरी जनता दरवर्षी नतमस्तक होते. बडोद्यातील सयाजी गार्डन मधील या संकल्पभुमिला दरवर्षी २३ सप्टेंबरला देशभरातुन आंबेडकरी जनता मोठ्या संख्येने अभिवादनासाठी एकत्र येते.

या संकल्पभुमिला १०७ वर्ष झाली असून संकल्पभुमी ही देशभरातील आंबेडकरी जनतेसाठी प्रेरणादायी आहे. त्यामुळे संकल्प भूमी जवळ गुजरात राज्य सरकारच्या वतीने महामानव डॉं. बाबासाहेब आंबेडकरांचे भव्य स्मारक २७ कोटी खर्च करुन उभारण्यात येत आहे. येत्या डिसेंबर पर्यंत हे स्मारक पूर्ण होईल. या स्मारकात लाईट आणि म्युझीक शो सुरु करण्यासाठी केंद्र सरकारच्या वतीने १० कोटीचा निधी मिळवुन देण्यासाठी आपण प्रयत्न करु तसेच गुजरातच्या मुख्यमंत्र्यांनाही आपण या स्मारकात लाईट अॅन्ड म्युझीक शो सुरु करण्यासाठी १० कोटीचा निधी देण्यासाठी पत्र पाठवणार असल्याचे प्रतिपादन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्य मंत्री ना. रामदास आठवले यांनी केले.

संकल्प भूमि उद्गम सितंबर 23 1917
संकल्प भूमि नामकरण अप्रैल 14, 2006

देशभरातील आंबेडकरी जनतेला प्रेरणादायी असणाऱ्या संकल्पभुमि येथे डॉं. बाबासाहेब आंबेडकरांचे भव्य स्मारक लवकर उभारले जाईल.हे स्मारक चार मजल्यांचे असून त्यांचे बांधकाम पूर्ण झाले आहे स्मारकातील सजावटी चे अंतर्गत काम वेगाने पूर्ण करण्यात येत आहे .या स्मारकात महामानव डॉ. बाबसाहेब आंबेडकरांचा भव्य पुतळा उभारण्यात येणार आहे .यात स्मारकात सभागृह आणि डॉ बाबासाहेब आंबेडकरांचा चित्रमय जीवनपट; मेडीटेशन सेंटर चा स्मारकात समावेश आहे.येत्या डिसेंबर मध्ये संकल्पभूमी स्मारक काम पूर्ण होणार आहे.या स्मारकात लाईट अँड साऊंड शो ची उभारणी करण्याठी १० कोटींचा खर्च असून हा खर्च केंद्र सरकार पर्यटन मंत्रालय आणि गुजरात राज्य सरकार कडून मिळवून देण्यासाठी आपण प्रयत्न करणार असल्याचे ना.रामदास आठवले यांनी सांगितले. यावेळी संकल्पभूमी सयाजी गार्डन बाहेर रिपब्लिकन पक्षाचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष सूर्यकांत वाघमारे यांच्या पुढाकारातून संकल्पभूमिला भेट देण्यास आलेल्या आंबेडकरी अनुयायांना मोफत अन्नदान करण्यात आले त्या स्थळाला ना. रामदास आठवले यांनी आज भेट दिली.यावेळी रिपब्लिकन पक्षाचे गुजरात राज्य अध्यक्ष अशोककुमार भट्टी, प्रभारी जतीन भुट्टा,लीलावतीबेन वाघेला, बडोदा जिल्हा अध्यक्ष राजेश गोयल आदी उपस्थित होते.

संपादकीय....

अखेर एन्काऊंटर

काही दिवसांपूर्वीच बदलापूर येथील एका शाळेत दोन चिमुकल्या विद्यार्थिनीवर अत्याचार झाल्याचे प्रकरण समोर आले होते. या घटनेनंतर बदलापूरमध्ये नागरिकांनी रेल्वे रुळावर उतरून आंदोलन केले होते. या आंदोलनामुळे तणावाचे वातावरण होते. त्यानंतर अक्षय शिंदे याला अटकही करण्यात आली होती. या आंदोलनाची दखल घेत राज्य शासनाने या प्रकरणाचा तपास करण्यासाठी एसआयटी नेमली होती. या एसआयटीच्या टीमने या प्रकरणाचा तपास करून कल्याण न्यायालयात आरोपपत्र दाखल केले होते. असे असतानाच अक्षय शिंदे याच्या दुसऱ्या पत्नीने दिलेल्या तक्रारीच्या आधारे पोलिसांनी त्याच्या विरोधात अनैसर्गिक लैंगिक संबंध प्रस्थापित केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला होता.या गुन्ह्याचा तपास करण्यासाठी ठाणे पोलिसांची क्राईम ब्राँच टीमने त्याला ताब्यात घेतले होते. पोलीस त्याला तळोजा कारागृहातून चौकशीसाठी घेऊन जात असताना त्याने पोलीस अधिकाऱ्याची बंदूक हिसकावून पोलिसांवर गोळ्या झाडण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी पोलिसांनी स्वसंरक्षणार्थ अक्षयवर गोळीबार केला यात तो ठार झाला. बदलापुरातील नामांकित शाळेत झालेल्या चिमूरड्यांवर अत्याचारानंतर बदलापुरात संताप व्यक्त होत होता. या गंभीर प्रकरणात शाळा व्यवस्थापनाने सुरुवातीला दुर्लक्ष करून हा प्रकार दाबण्याचा प्रयत्न केला होता. तसेच पुढे पोलिसांपर्यंत हे प्रकरण पोहोचल्यानंतर त्यांनी यात गुन्हा दाखल करण्यात दिरंगाई केली होती.

सरपंच आणि उपसरपंचांच्या मानधनात वाढ, मंत्रीमंडळाचा निर्णय

(पान १ वरून..) योजनेतील बाह्य यंत्रणेद्वारे कार्यरत अधिकारी, कर्मचारी यांच्या मानधनात वाढ करण्याचा निर्णय घेतलेला आहे. राज्यातील घरकुले विहित वेळेत पूर्ण करण्यासाठी राज्यस्तर, विभागस्तर, जिल्हास्तर व तालुकास्तरावरील कार्यरत असणाऱ्या कंत्राटी व बाह्य यंत्रणेद्वारे कार्यरत असणाऱ्या अधिकारी, कर्मचारी यांना प्रोत्साहन देण्यासाठी व कामे गतीने पूर्ण करण्यासाठी त्यांच्या मानधनामध्ये २० % वाढ करण्याचा निर्णय घेतलेला आहे. मंत्री महाजन म्हणाले, मागील दोनवर्षामध्ये ग्रामविकास विभागाने १० लाख घरकुले पूर्ण केली असून राज्यातील कामाची गती विचारात घेता केंद्र सरकारने देखील या वर्षाकरिता प्रधानमंत्री आवास योजनेमध्ये देशामध्ये सर्वात जास्त ६.३७ लाखाचे उद्दिष्ट राज्याला दिले आहे. प्रधानमंत्र्यांनी जी जबाबदारी आमच्यावर दिलेली आहे ती वेळेत आम्ही १०० टक्के पार पाडू. राज्यामध्ये मोदी आवास योजनेअंतर्गत ओबीसी व एसबीसी प्रवर्गासाठी ३ वर्षामध्ये १० लाख घरकुले आम्ही वेळेत पूर्ण करु. बचतगटासाठी कार्यरत असलेल्या प्रभाग स्तरावरील संसाधन व्यक्तींच्या मानधनामध्ये वाढ करण्यात आली असून. प्रभाग स्तरावरील संसाधन व्यक्ती कृषी व्यवस्थापक, पशु व्यवस्थापक, मत्स्य व्यवस्थापक आणि प्रभाग संघ व्यवस्थापक यांच्या मानधनामध्ये २०% वाढ करण्यात आली आहे. पूर्वी त्यांचे मानधन रु. ७५०० ते ११००० होते ते आता ९००० ते १३२०० पर्यंत झालेले आहे अशी माहिती मंत्री गिरीश महाजन यांनी दिली.

डाउनलोड करणे किंवा पाहणे पॉक्सो कायद्यानुसार गुन्हा : सर्वोच्च न्यायालय

(पान १ वरून..) केला. बाल पोर्नोग्राफी डाउनलोड करुन पाहण्याऱ्या २८ वर्षीय व्यक्तीविरुद्ध फौजदारी कारवाई मद्रास उच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर रद्द करण्यात आली होती. याचिकाकर्त्याचे प्रतिनिधित्व करणारे ज्येष्ठ वकील एचएस फुलका यांनी युक्तिवाद केला की उच्च न्यायालयाचा निर्णय पोस्को कायद्याचे उल्लघंन करते. सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी सुनावणीदरम्यान निरीक्षण नोंदवले की, बाल पोर्नोग्राफी हा शब्द हटवून बाल लैंगिक अत्याचार आणि बाल शोषण करणारी वस्तू म्हणून पुनर्परिभाषित करण्यासाठी झजउडज कायद्यात सुधारणा करण्याचे खंडपीठाने संसदेला सुचवले आहे. हा बदल सुलभ करण्यासाठी अध्यादेश काढला जाऊ शकतो, असेही खंडपीठाने सुचवले. सुप्रीम कोर्टाने मद्रास उच्च न्यायालयाच्या निर्णयाला फौजदारी कार्यवाही रद्द करण्याच्या भूमिकेला अत्यंत गंभीर त्रुटी म्हणून लेबल केले आणि फौजदारी खटला पुन्हा सुरू केला आहे. निकालावर बोलताना, न्यायमूर्ती पार्डीवाला यांनी सरन्यायाधीश चंद्रचूड यांना यांचे आभार व्यक्त केले. सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी निकालाच्या ऐतिहासिक स्वरूपाची नोंद केली आहे. सरन्यायाधीश चंद्रचूड म्हणाले, जागतिक स्तरावर पहिलेच उदाहरण आहे जेथे बाल लैंगिक शोषण आणि गैरवर्तन सामग्रीवरील कायद्याचे न्यायव्यवस्थेद्वारे इतक्या तपशीलवार परीक्षण केले गेले आहे.

मारवाडी फाउंडेशनतर्फे केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार केंद्रीय मंत्री नितीन गडकरींच्या हस्ते प्रदान

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

मुंबई : आम्हाला चौथ्यांदा सत्तेत येण्याची गॅरंटी नाही. मात्र रामदास आठवले यांना आमचे सरकार येऊन मंत्री होण्याची गॅरंटी आहे. खरे म्हणजे सरकार कोणाचेही आले तरी ना. रामदास आठवले यांचे मंत्रीपद पक्के आहे. असे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी म्हणाले.

मारवाडी फाउंडेशनतर्फे देण्यात येणारा भारतरत्न डाँ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांना नितीन गडकरींच्या हस्ते प्रदान करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते.

कार्यक्रमाला फाऊंडेशनचे अध्यक्ष गिरीश गांधी, माजी खासदार प्रदीप गांधी, सुधीर बाहेतील, सीमा आठवले उपस्थित होते. गडकरी म्हणाले की, ना. रामदास आठवले आता तिसऱ्यांदा केंद्रात मंत्री आहेत. पुढे होणाऱ्या लोकसभा निवडणुकीत आमचे सरकार येऊन त्यांना पुन्हा मंत्री होण्याची गॅरंटी आहे. आम्हाला मात्र ती गॅरंटी नाही. गमतीने मी नेहमीच म्हणत असतो की, राज्य कोणाचेही आले तरी ना. रामदास आठवले यांचे स्थान मंत्रिमंडळात पक्के आहे. एकदा लालुप्रसाद यादव हे रामविलास पासवान यांना म्हणाले होते की, ना. रामदास आठवले राजकीय हवामान शास्त्रज्ञ आहे.

राजकारणात पुढे काय होणार याचे भविष्य त्यांना चांगले कळते. गिरीश गांधी, सामाजिक , राजकीय, साहित्यीक अशा सर्वच क्षेत्रातील व्यक्तींना प्रोत्साहन देत असल्याचे गडकरी म्हणाले.

मी चळवळीतुन पुढे आलो असून समाजामध्ये व्यावहारीक आंबेडकरवाद रुजवायचा आहे. सर्व जाती धर्मीय समाजाला जोडायचे आहे. देश एकसंघ जोडून ठेवला पाहिजे हीच डॉ बाबासाहेब आंबेडकरांची भावना होती.त्यानुसार सामाजिक आणि आर्थिक न्याय मिळवून देण्यासाठी आपला संघर्ष सुरू आहे.डाँ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने पुरस्कार मिळतो ह माझ्या आयुष्यातील मोठा क्षण आहे असे सत्काराला उत्तर देताना रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना रामदास आठवले म्हणाले.

पंतप्रधान नरेंद्र मोदींना सत्तेत येण्याचे तंत्र माहीत असल्याने आम्ही चौथ्यांदा केंद्रात सरकार बनवू असा विश्वास ना.रामदास आठवले यांनी यावेळी व्यक्त केला.

टाकळीवाडी येथे पावसामुळे श्री गणेश मंदिरामध्ये भाविक भक्तांची तारांबळ

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पत्रकार/नामदेव निर्मळे : टाकळीवाडी तालुका शिरोळ येथील श्री गणेश मंदिरामध्ये संकष्टी निमित्त मोठ्या प्रमाणात भाविक भक्त येत असतात. लहान बालके,वयोवृद्ध यांची गर्दी असते. मंदिरासमोर निवारा शेड तसेच फरशी नसल्यामुळे पावसामुळे चिखल निर्माण होत आहे.याच चिखलातून दर्शन भाविक भक्त घेत आहेत. दर संकष्टीला महाप्रसादाचे आयोजन करण्यात येते. पावसामुळे प्रसाद घेण्यासाठी छोटीशी खोली आहे.पावसात भाविक भक्तांची तारांबळ उडत आहे. तसेच रस्ता अपुरा करण्यात आलेला आहे. या रस्त्यावर गटारीचे, पावसाचे पाणी येत आहे. यातूनच

भाविक भक्त येत आहेत.तरी त्वरित भक्तांची मागणी पूर्ण करावी अशी मागणी जोर धरत आहे.

ग्रीन फाऊंडेशन महाराष्ट्र राज्यच्या उपाध्यक्षपदी तुषार महाजन यांची नियुक्ती

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

नगर प्रतिनिधी : ग्रीन फाऊंडेशन महाराष्ट्र राज्यच्या उपाध्यक्ष पदी सामाजिक कार्यकर्ते व नाविन्यपूर्ण उपक्रम राबविणारे तुषार संजय महाजन यांची नियुक्ती करण्यात आली आहे. साधना सहकारी बँक मा.व्हा.चेअरमन बाळासाहेब बापुराव कोळपे व ग्रीन फाउंडेशन संस्थापक/अध्यक्ष अमित जगताप यांनी त्यांची नियुक्ती केली आहे.

याप्रसंगी तुषार महाजन म्हणाले, पर्यावरण संरक्षण करणे, जनजागृती करणे, वृक्ष लागवडकरणे, वृक्षाचे संवर्धन करणे, एक कुटुंब, एक झाड ही संकल्पना प्रत्यक्ष राबविणे, शाळांमध्ये, महाविद्यालयात वृक्ष कार्यक्रम आयोजन, निबंध / वक्तृत्व स्पर्धा आयोजित करणे, निसर्गाच्या संरक्षणासाठी विविध उपाययोजना करणे, झाडे लावा झाडे जगवा, वृक्ष चळवळ लोक चळवळ व्हावी यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले. निसर्गाची साखळी टिकवून ठेवण्यासाठी त्याचे संवर्धन करणे काळाची गरज आहे. व ग्रीन फाउंडेशन महाराष्ट्र राज्यचे कार्य संपुर्ण महाराष्ट्र पोहोचवणार असल्याची माहीती ग्रीन फाउंडेशन उपाध्यक्ष तुषार महाजन यांनी दिली.

शिर्डीत संघटनात्मक बैठकीचे आयोजन

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

नगर प्रतिनिधी : आज शिर्डी आगामी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता युवा मोर्चा शिर्डी शहर व राहाता मंडळ जिल्हा पदाधिकारी यांची संघटनात्मक बैठक शिर्डी विधानसभाचे निरीक्षक व गुजरात विधानसभाचे मा.अध्यक्ष श्री.राजेंद्रजी त्रिवेदी व युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष योगेश गोंदकर, शहराध्यक्ष विकास गोंदकर यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली.

यावेळी येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत संदर्भात चर्चा करण्यात आली. विरोधकाकडून जो फेक नेरेटिव सेट केला जात आहे त्याला थेट नेरेटिवने उत्तर भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने देण्यात येणार आहे. बूथ सक्षमीकरणावर जोर देत, बूथ रचना मजबूत करण्याबाबत चर्चा करण्यात आली. बूथ प्रमुखांना कार्याचे योग्य वाटप करण्याबाबत सूचना देण्यात आल्या, तसेच मतदारांना केंद्र व राज्य सरकारच्या उपक्रमांची माहिती देण्याची जबाबदारी दिली. ४० दिवस पूर्णवेळ युवा मोर्चाचे कार्यकर्त्या काम करण्याचा संकल्प करण्यात आला.

गुजरात विधानसभाचे मा.अध्यक्ष राजेंद्रजी त्रिवेदी सर यांनी भारतीय जनता युवा मोर्चा प्रसिद्धीप्रमुख तुषार संजय महाजन यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांचा सत्कार केला.

यावेळी उपाध्यक्ष जितेंद्र माळवदे, नवनाथ मुजमुले, गणेश सोनवणे, सतीश गायकवाड, किरण बर्डे, सतीश बावके, लखन बेलदार, तालुकाध्यक्ष राहुल गोरे, प्रसाद शेलार, राजु बलसाने, अक्षय मुळे, प्रसाद बावचे, प्रसाद सुरंजे, गिरधारी सोनेजी, शुभम भोर, संदीप थोरात, सागर जेजुरकर व युवा पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रशिक सामाजिक संस्थेच्या शिबिरास सोलापूर समाज कल्याण सहाय्यक आयुक्तांची सदिच्छा भेट

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

सोलापूर (प्रतिनीधी) : प्रशिक सामाजिक संस्थेच्या वतीने मिलिंद नगर मध्यवर्ती बुद्ध विहार बुधवार पेठ येथे विविध प्रशिक्षण शिबिर व विविध योजनांचे फॉर्म भरण्याच्या मोफत शिबिरास सोलापूर समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त मा सचिन कवले साहेब यांनी सदिच्छा भेट दिली.

यावेळी संस्थेच्या वतीने व पुज्य भंते सारीपुत्र यांच्या हस्ते मानाची टोपी, शाल,व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी कवले यांनी शिबिराचे महत्व उपस्थितांना समजुवून सांगितले व मार्गदर्शन करीत संस्थेच्या कार्याचे कौतुक करून संस्थेस पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

यां प्रसंगी बार्टी चे आधिकरी प्रणिता कांबळे मॅडम, समतादुत अश्विनी सुपाते मॅडम, प्रशिक सामाजिक संस्थेचे प्रमुख सल्लागार शिवम सोनकांबळे, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर मध्यवर्ती जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष नागेश रणखांबे, प्रबुद्धकुमार दोड्यानुर, अजय बाबरे,अनिकेत जगताप,बापू कापुरे,अभिषेक जगझाप,क्षितीज माने व मिलिंद नगर परिसरातील लाभार्थी महिला उपस्थित होत्या.

धनगर समाजाचा अक्कलकोटला चक्का जाम आंदोलन

(पान १ वरून..) समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर रास्ता रोको आंदोलनास माजी गृहराज्यमंत्री सिध्दाराम म्हेत्रे, रिपाईचे तालुका अध्यक्ष अविनाश मडिखांबे, वंचित बहुजन आघाडीचे तालुका युवक अध्यक्ष शिलामणी बनसोडे, जिल्हा परिषदेचे माजी विरोधी पक्षनेते आनंद तानवडे, युवा नेते रमेश पाटील, मनसेचे तालुका अध्यक्ष मल्लिनाथ पाटील, तळेवाड ग्रामपंचायत यांच्या वतीने पाठींब्याचे लेखी पत्र दिले. रास्ता रोको आंदोलनावेळी बोलताना माजी गृहराज्यमंत्री सिध्दाराम म्हेत्रे म्हणाले की आमची सत्ता आल्यास पहिल्या कॅबिनेट मिटींगमध्ये धनगर समाजाचा एस. टी. आरक्षणाची प्रश्न सोडवू असा शब्द तत्कालीन माजी विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी दिली होती. पण आजतागायत दहा वर्षे झाली पण आश्वासन पुर्ण केले नाही. तरी धनगर समाज बांधव येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत त्यांना त्यांची जागा दाखवून देण्याची वेळ आली असल्याचे सांगितले. रासपचे पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष सुनिल बंडगर म्हणाले की येणाऱ्या आगामी विधानसभा निवडणुकीच्या पुर्वी एस. टी. आरक्षणाची अंमलबजावणी झाली नाही तर धनगर समाज बांधव निर्णायक भुमिका घेईल. यापुढे धनगर समाज बांधवांनी फक्त धनगर समाजाच्या उमेदवाराला मते देऊन आपलेच उमेदवार निवडून आणावे असे आवाहन केले. तर रिपाईचे अक्कलकोट तालुका अध्यक्ष अविनाश मडिखांबे यांनी बोलताना म्हणाले की धनगर समाजाचा एस. टी. प्रवर्गात समावेश करण्यासाठी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदासजी आठवले यांनी याबाबत अनेकवेळा लेखी पाठिंबा दिला आहे. सरकारने धनगर समाजास तात्काळ आरक्षणाची अंमलबजावणी करुन त्यांना न्याय मिळवून द्यावा अशी मागणी केली. यावेळी जिल्हा परिषदेचे माजी विरोधी पक्षनेते आनंद तानवडे, पंचायत समितीचे माजी विरोधी पक्षनेते बाळासाहेब मोरे, शिवसेना उबाठाचे तालुका प्रमुख आनंद बुक्कानुरे, मनसेचे तालुका प्रमुख मल्लिनाथ पाटील, अनिल बर्वे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. रास्ता रोको आंदोलनामुळे नागरीकांची थोडी गैरसोय झाली. जवळपास एक तास भर चक्का जाम केल्याने दोन्ही बाजूला वाहनांची रांग लागली होती. यावेळी पोलीस प्रशासनाकडून चोख बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. कोणताही अनुचित प्रकार न घडता रास्ता रोको आंदोलन यशस्वीपणे पार पडला. यावेळी सदर रास्ता रोको आंदोलनावेळी सुत्रसंचालन रासपचे अक्कलकोट तालुका अध्यक्ष दत्तात्रय माडकर यांनी केले.

बालविवाह रोखण्यासाठी उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल राष्ट्रीय पुरस्कार

आयएएस दीपा मुधोळ मुंडे यांना प्रतिष्ठित स्वॅच पुरस्कार

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

बीड जिल्ह्यात जिल्हाधिकारी असताना २०२४ च्या बालविवाह राष्ट्रीय प्रतिबंध कार्यक्रमात त्यांचा उत्कृष्ट कामाबद्दल दीपा मुधोळ-मुंडे यांना प्रतिष्ठित स्वॅच पुरस्कार देण्यात आला .

दीपा मुधोळ- मुंडे हे सध्या पुणे महानगर परिवहन महामंडळ (स्वारगेट) च्या अध्यक्षा आणि एमडी आहेत आणि मूळच्या कर्नाटकच्या आहेत. ते १२ जुलै २०२४ पर्यंत बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी म्हणून कार्यरत होते आणि ३ जून रोजी त्यांची बदली पुण्यात झाली आहे. बीड जिल्ह्यात त्यांनी शासनाचा बालविवाह प्रतिबंध कार्यक्रम अतिशय काटेकोरपणे राबवून उत्कृष्ट कार्य केले. त्यांच्या दीड वर्षाच्या कार्यकाळात २०२३ मध्ये १२१ बालविवाह आणि २०२४ मध्ये २६६ बालविवाह रोखले आणि बालविवाह करणाऱ्यांवर गुन्हे नोंदवले. दीपा मुधोळ मुंडे यांनी बालविवाह मधे सहभागी संबंधितांवर गुन्हा दाखल केला होता. त्यांनी केलेल्या जागरूकता, चेतावणी आणि कठोर उपाययोजनांमुळे या प्रतिष्ठित राष्ट्रप्रसस्थी भेटले आहे दिल्लीच्या स्वॅच संस्थेने १९ सप्टेंबर रोजी पुरस्काराने सन्मानित केले आहे.

त्यांनी काय केले?:

बालविवाह का नको ? त्याचे तोटे काय आहेत? बालविवाह कायद्याच्या विरोधात का? शाळेतूनच त्यांनी जनजागृती केली. बालविवाह रोखण्यासाठी त्यांनी गावोगावच्या भिंतींवर १०८८ (चाइल्ड हेलाइन) क्रमांक लिहिला. हा क्रमांक इतका लोकप्रिय झाला की त्याला वारंवार कॉल येऊ लागले. त्यामुळे येथे होणारे बालविवाह रोखता आले. बालविवाह रोखण्यासाठी त्यांनी स्वतः एक संघ तयार केला - बातमी मिळताच एका टीमने लग्न होत असलेल्या ठिकाणी छापा टाकून लग्न थांबवले, मुलींसह मुलांचे पालक, नातेवाईक, फोटोग्राफर, मंगल कार्यालय मालक व पुरोहित यांच्यावर गुन्हे नोंद करण्यात आली.

१०, १३ आणि १५ वयोगटातील मुलींचे बालविवाह होत असल्याने प्राथमिक आणि माध्यमिक शाळांमध्ये जनजागृती कार्यक्रम आयोजित करून, त्यांना बालविवाह बद्दल माहिती देणे, बालविवाहाला न घाबरता कसे त्याचा विरुद्ध आवाज उठवावे, कोण मदत करेल? त्याबाबत जनजागृती केली जात होती. तसेच दर सोमवारी मुलींकडून ही प्रतिज्ञा घेण्यात आली व ही प्रतिज्ञा सर्व शाळांमध्ये सक्तीची करण्यात आली, त्यामुळे मुलींमध्ये ऋलीळल होऊन अनेक मुलींनी

SKOCH AWARD

१०९९ (चाइल्ड हेल्प लाईन) क्रमांका वर कॉल करून बालविवाहातून सुटका करून घेतले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

दैनिक
यश सिद्धि न्यूज

गुन्हेगारी जगत...

क्रीडा संकुल येथून दुचाकी पळवली

सोलापूर, (प्रतिनिधी) : क्रीडा संकुल येथे पार्क करून ठेवलेली दुचाकी क्रमांक.१३.बी. झेड.५१९७ ही अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना १४ सप्टेंबर रोजी दुपारी चार ते पाच वाजण्याच्या दरम्यान क्रीडा संकुल येथे घडली.याप्रकरणी नरेश शंकर दुस्सा (वय-३३,रा.स्वागत नगर,सेना बेकरी जवळ) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल मुलाणी हे करीत आहेत.

लष्कर मधील गुडलक मोबाईल शॉपीत चोरी

सोलापूर, (प्रतिनिधी) : लष्कर मधील गुडलक मोबाईल शॉपीच्या मागील पत्राचा दरवाजा कशाच्यातरी साह्याने उघडून अज्ञात चोरट्याने आत प्रवेश करून दुरुस्ती करिता आलेले ग्राहकांचे मोबाईल व दुकानातील मोबाईल,चार्जर केबल,रोख रक्कम असा ऐवज अज्ञात चोरट्याने चोरून नेला आहे.ही घटना १८ ते १९ सप्टेंबर दरम्यान घडली.याप्रकरणी मोहसिन नासिर पठाण (वय-३७-,रा.अमन चौक) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल फुटाणे हे करीत आहेत.

घोडा तांडा येथे रक्कमसह दागिने लंपास

सोलापूर (प्रतिनिधी) बंद घराच्या रूमचा आतून कडी लावलेला तुटलेला दरवाजा बाहेरून ढकलून अज्ञात चोरट्याने आत प्रवेश करत रूम मधील लोखंडी कपाटाचा दरवाजा तोडून सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा एकूण ९५ हजारांचा ऐवज चोरून नेल्याचे घटना २० सप्टेंबर रोजी घोडा तांडा येथे घडली.याप्रकरणी सुनिता देवचंद पवार (वय-४०,रा.घोडा तांडा) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल हार हे करीत आहेत.

एसटी स्टँड कॉलनी येथून दुचाकी लंपास

सोलापूर (प्रतिनिधी) एसटी स्टँड कॉलनी येथे पार्क करून ठेवलेली दुचाकी क्रमांक एमएच.१३.बीएफ.३३१८ ही अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे.ही घटना १८ ते १९ सप्टेंबर दरम्यान घडली.याप्रकरणी दिनेश सिद्धाराम आलुरे (वय-३५,रा.सिद्धमोग नगर,शेळगी) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पोलीस नाईक मुलाणी हे करीत आहेत.

कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १३७ व्या जयंतीनिमित्त पंढरपूर शहरातून दिमाखदार रॅली संपन्न

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर: येथील कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालय व यशवंत विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या एकशे सदतीसव्या जयंतीनिमित्त फुलांनी सजविलेल्या रथातून पंढरपूर शहरामधून काढण्यात आली. या रॅलीचे उद्घाटन रयत शिक्षण संस्थेच्या मनेजिंग कौन्सिलचे सदस्य व माजी सचिव प्रिं. डॉ. जे. जी. जाधव यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे, रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडीचे सदस्य अमरजित पाटील, डॉ. राजेंद्र जाधव, सुनेत्राताई पवार, सेवानिवृत्त प्राचार्य डॉ. दादासाहेब साळुंखे, उपप्राचार्य डॉ. भगवान नाईकनवरे, उपप्राचार्य डॉ. तुकाराम अनंतकवळस, उपप्राचार्य प्रा. राजेश कवडे, अधिष्ठाता डॉ. बाळासाहेब बळवंत, अधिष्ठाता डॉ. अनिल चोपडे, मुख्याध्यापिका अनिता साळवे आदी मान्यवर उपस्थित होते.

ढोल ताशा, लेझीम आणि टिपरी नृत्याने या रॅलीची रंगत वाढविली. या रॅलीत यशवंत विद्यालयातील विद्यार्थ्यांनी कर्मवीर भाऊराव पाटील, रयतमाउली सौ. लक्ष्मीबाई, आर्मीचे सैनिक यांचा जिवंत देखावा तयार केला होता. ही रॅली पंढरपूर शहरातील कॉलेज - सरगम चौक - इंदिरा गांधी चौक - भोसले चौक - अर्बन बँक - भादुले चौक - नगर पालिका - छत्रपती शिवाजी चौक - सावरकर पुतळा - डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक - पंढरपूर तालुका पोलीस स्टेशन - मार्केट यार्ड - कॉलेज या मार्गाने मुख्य रस्त्यावरून काढण्यात आली. या रॅलीत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या कार्याची महती सांगणारे फलक धारण केले होते. रिक्षातून लाउड स्पीकर वरून कर्मवीरांचे कार्य, त्यांच्या विषयी अभ्यासक आणि साहित्यिकांनी व्यक्त केलेली मते उद्धृत केली गेली. या रॅलीच्या वेळी कर्मवीरांच्या प्रतिमेस पंढरपूर शहरातील रयतप्रेमी संतोष भाऊ नेहतराव, बाळासाहेब नेहतराव, जयवंतराव माने, शंकर खरात, नवनाथ खरात, तानाजी खरात, महादेव लोहकरे, माजी नगराध्यक्ष सुभाष भोसले, धर्मवीर शिवाजी आप्पा कोळी, राजकुमार लवटे, भारत भिंगे, राजू निंबाळकर, संजय मुळे, संत सद्गुरू गाडगे महाराज येथील अशोक माने, एम. एम. पावले यांनी पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली.

ही रॅली यशस्वी करण्यासाठी पंढरपूर शहर पोलीस स्टेशन प्रशासन, पंढरपूर नगर पालिका प्रशासन यांनी विशेष सहकार्य केले. शेवटी रॅलीत सहभागी झालेल्या सर्वांचे आभार महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ चंद्रकांत खिलारे आणि सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. रमेश शिंदे यांनी मानले. विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करून रॅलीची सांगता करण्यात आली.

जिल्हास्तरीय पुरस्काराने सन्मानीत हरणावळ गुरुजी यांचा प्रवीण माने यांच्या वतीने सत्कार

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

इंदापूर प्रतिनिधी, अतुल सोनकांबळे

इंदापूर तालुक्यातील ग्रामीण भागामध्ये अतिशय उत्कृष्ट व गुणवत्तापूर्वक शिक्षण प्रसारात नेहमीच अग्रणी असणारी शिक्षण संस्था म्हणजे गोखळी येथील गुरूकुल विद्यामंदिरचे नाव संपूर्ण पुणे जिल्ह्यात करण्याचे काम करणाऱ्या गुरुकुल विद्यामंदिर गोखळीचे संस्थापक अध्यक्ष

श्री बाळासाहेब हरणावळ गुरुजी यांना जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाला.

पुरोगामी लोकशाही आघाडी, पुणे जिल्हा माध्यमिक शिक्षक-शिक्षिका संघ यांच्यावतीने पुरंदर येथे हरणावळ गुरुजींचा सत्कार करण्यात आला.

गोखळी सारख्या ग्रामीण भागात प्रतिकूल परिस्थितीत आज तब्बल ३००० विद्यार्थी शाळेत शिकत आहेत. बरेच विद्यार्थी नवोदय शिष्यवृत्ती, जेईई व नीट परीक्षेत चमकले असून हे हरणावळ गुरुजींचे यश आहे.

या निमित्ताने माजी बांधकाम आरोग्य सभापती श्री प्रवीणभैया माने यांनी हरणावळ गुरुजींचा सन्मान करून त्यांना कर्मवीर भाऊराव पाटील जयंतीच्या पूर्वसंध्येला त्यांना भावी शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी समदभाई सय्यद, निलेश रंधवे, छगन बनसुडे, राजेश अवचर, अंकुश दोरकर, प्रविण निगडे, जोतिराम अनपट, संकेत वाघमोडे, आकाश पवार आणि इतर सहकारी उपस्थित होते.

श्री शमी विघ्नेश गणेश मंदिरात लिंगराज कुंभार यांच्या हस्ते पूजन

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

अक्कलकोट : (प्रतिनिधी) श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली शनिवारी संकष्टी चतुर्थी निमित्त न्यासाच्या श्री शमी विघ्नेश गणेश मंदिरात लिंगराज कुंभार यांच्या हस्ते पूजन करण्यात आले.

शमीवृक्षाखाली गेल्या ३३ वर्षा पूर्वी श्री गणेशाची स्थापना करून सुंदर असे मंदिर व सभामंडप बांधण्यात आले आहे. श्री स्वामी समर्थांच्या पावन भूमीवर श्री शमी विघ्नेश गणेश असल्याने त्याचे स्थान व महात्म्य अलौकिक आहे. संकष्टी चतुर्थी मोठ्या श्रद्धेनं आणि उत्साहात साजरा करण्यात आली.

याप्रसंगी न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र व श्रीफळ देऊन मंडळाच्या वतीने लिंगराज कुंभार यांचा सहपरिवार सत्कार करण्यात आला.

यावेळी न्यासाचे पुरोहित अप्पू पुजारी, संजय कुलकर्णी, अप्पा हंचाटे, बाळासाहेब घाडगे, निखिल पाटील, प्रवीण घाटगे,पिट्टू साठे,राजू पवार, प्रसाद हुल्ले, रमेश हेगडे, विशाल घाटगे, विठ्ठल रेड्डी,चंदू हिबारे, अनिल गवळी, गुरुपादप्पा उडचण,प्रकाश पांढरे,सुरज सावंत यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेच्या जिल्हा चाचणी स्पर्धेत अमोल राजे भोसले ग्रुपचा पै. पुरुषोत्तम (यश) कुलकर्णी विजयी

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

अक्कलकोट : (प्रतिनिधी) : महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेच्या जिल्हा चाचणी स्पर्धेत अमोल राजे भोसले ग्रुपचा पै. पुरुषोत्तम (यश) कुलकर्णी विजयी.

महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाच्या वतीने घेण्यात आलेल्या जिल्हा चाचणी स्पर्धेत अक्कलकोट तालुक्यातील पै.पुरुषोत्तम कुलकर्णी याने ग्रीको रोमन १५ वर्षाखालील ४४kg वजन गटात विजय मिळविला.त्याची आता राज्य स्तरीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली आहे. अमोलराजे पैलवान ग्रुप चा पैलवान आहे.

सभासदांच्या सहकार्यामुळेच व्यापारी पतसंस्थेची यशस्वी वाटचाल : श्रीकांत मिणीयार

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

उमरगा, (प्रतिनिधी) : कुठलीही पतसंस्था ही सभासद, ठेवीदार व कर्जदार यांच्या सहकार्यावर चालत असते. या पतसंस्थेची वाटचाल केवळ सभासदाच्या सहकार्यामुळे झाल्याचे प्रतिपादन संस्थेचे सचिव श्रीकांत (राजू) मिणीयार यांनी केले. व्यापारी नागरी सहकारी पतसंस्थेची २९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवारी (ता. २२) रोजी रत्नमाला मंगल कार्यालयात पार पडली. या सभेच्या अध्यक्षस्थानी बालाप्रसाद काबरा होते. यावेळी संस्थेचे चेअरमन उमेश कारभारी, व्हाईस चेअरमन अशोक चव्हाण, सचिव श्रीकांत मिणीयार, सुरेश रणसुरे, दत्तात्रय गिरीबा, रविंद्र ख्याडे, अशोक जाधव, बाबुराव हंगरगे सर्व संचालक मंडळ मंडळाची प्रमुख उपस्थिती होती.

प्रारंभी स्व. माधवराव (काका) पाटील, गुंडांप्पा मंगरूळे, संचालक स्व. भगवानदास झंवर, वीरभद्र सोलापूरे यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली. पुढे बोलताना मिणीयार म्हणाले की, सभासदाच्या विश्वासाला साथ देत या पतसंस्थेने मार्च २०२४ या आर्थिक वर्षात १८ लाख ८३ हजार ३२३ रुपयाचा नफा झाला आहे. या संस्थेचे ५६२ सभासद असून सभासदांना यंदा बारा टक्के लाभांश देण्यात येणार आहे. या पतसंस्थेच्या ठेवी ७ कोटी ३१ लाख ६५ हजार ५३१ रुपयाच्या असल्याचे त्यांनी सांगितले. प्रास्ताविक व अहवाल वाचन सिद्राप्पा तुगावे यांनी केले. सूत्रसंचलन बाळासाहेब गिरीबा तर आभार सिध्द् स्वामी यांनी मानले. यावेळी बँकेचे सभासद, व्यापारी, नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते.

‘फार्मा इंडस्ट्री’ आणि ‘टॅबलेट कोटिंग’ मधील नवीन तंत्रज्ञान आणि संशोधन यावर मार्गदर्शन

विविध विषयांची मिळाली सखोल माहिती

स्वेरी फार्मसीमध्ये दोन दिवसीय इंडस्ट्री एक्स्पर्ट लेक्चर सिरीज संपन्न

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर- गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचालित, कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये दि.०८ सप्टेंबर ते दि.०९ सप्टेंबर २०२४ या दोन दिवसात फार्मसी क्षेत्रातील तज्ञांचे मार्गदर्शन आयोजित करण्यात आले होते. या सत्रात प्रमुख अतिथी व मार्गदर्शक म्हणून 'क्रा ड्राय फार्मा प्रायव्हेट लिमिटेड.' (जि.ठाणे) या कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक लक्ष्मीकांत सदाफुले हे उपस्थित होते.

स्वेरीज् कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये दोन दिवसीय इंडस्ट्री एक्स्पर्ट लेक्चर करिता आलेल्या क्रा ड्राय फार्मा प्रायव्हेट लिमिटेड.' कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक लक्ष्मीकांत सदाफुले यांचे स्वागत करताना फार्मसीचे प्राचार्य डॉ. मिथुन मणियार सोबत डिप्लोमा फार्मसी विभागाचे प्रमुख डॉ. जितेंद्र कंदले.

स्वेरीचे संस्थापक सचिव डॉ.बी.पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली व फार्मसीचे प्राचार्य डॉ.मिथुन मणियार यांच्या नेतृत्वाखाली या मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले होते. या सत्राला प्रमुख अतिथी म्हणून क्रा ड्राय फार्मा प्रायव्हेट लिमिटेड.' या कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक लक्ष्मीकांत सदाफुले हे होते. दीपप्रज्वलनानंतर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मिथुन मणियार यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. डॉ.मणियार यांनी प्रास्तविकात कॉलेज बद्दल माहिती सांगताना म्हणाले की, ‘भारत हा जगाचा ‘फार्मसी हब’ म्हणून ओळखला जाणारा देश आहे. भारतामध्ये फार्मसीच्या क्षेत्रात नवनवीन संशोधने सुरु असतात. त्यामध्ये औषधे तयार करताना वापरल्या जाणाऱ्या विविध तंत्रज्ञानाचा समावेश आहे. त्यातीलच एक ‘टॅबलेट कोटिंग’ म्हणून ओळखली जाणारी महत्वाची प्रक्रिया सध्या ‘फार्मा इंडस्ट्री’मध्ये महत्वाची असून ती अनिवार्य आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी या क्षेत्राकडे उत्तम करिअरचा एक पर्याय म्हणून पाहण्यास हरकत नाही. दिवसेंदिवस फार्मसीचे महत्व वाढत असून ते लोकांना जाणवत देखील आहे, ‘टॅबलेट कोटिंग इंडस्ट्री’ मध्ये सध्या असणाऱ्या मागणीमुळे विद्यार्थ्यांना नोकरी किंवा व्यवसाय यामध्ये भारत आणि भारताबाहेर खूप संधी उपलब्ध झाल्या आहेत. त्यामुळे ह्या विषयाचे मार्गदर्शन हे विद्यार्थ्यांसाठी उपयोगी ठरेल.’ फार्मसी क्षेत्रातील जवळपास २० वर्षांपेक्षा अधिक अनुभव असलेल्या सदाफुले यांनी ‘फार्मा इंडस्ट्री’ बद्दलची अद्ययावत माहिती दिली. त्यामध्ये त्यांनी प्रत्यक्षरित्या कंपनीमध्ये कशा पद्धतीचे काम काज चालते, औषध निर्मितीसाठी कोणकोणती साधने, द्रव्ये वापरली जातात, कोणत्या प्रक्रिया कोणत्या क्रमाने कराव्या लागतात, सध्या फार्मा कंपन्यांची गरज आणि अभ्यासक्रमामध्ये आवश्यक गोष्टी यांबद्दल त्यांनी सविस्तर माहिती दिली. दुसऱ्या दिवशी झालेल्या व्याख्यानामध्ये सदाफुले यांनी ‘टॅबलेट कोटिंग’ बद्दलची सखोल माहिती विद्यार्थ्यांना दिली. ‘टॅबलेट कोटींग’ म्हणजे नेमके काय, त्याच्या पद्धती कोणत्या, त्याच्या जुन्या पद्धती व त्यामुळे झालेले तोटे, नवीन पद्धती व त्याचे होणारे फायदे, तसेच नवीन उपकरणे व त्यांचा वापर कशा पद्धतीने करायचा? याबाबत सविस्तर माहिती दिली. त्याचबरोबर ‘टॅबलेट कोटिंग’ मध्ये चालत असणाऱ्या वेगवेगळ्या प्रक्रिया, काम करताना येणारे अडथळे याचा उत्पादनावर होणारा परिणाम, प्रॉडक्ट्स मध्ये येणाऱ्या त्रुटी व त्या त्रुटी कमी करण्यासाठी वापरली जाणारी प्रक्रिया, या गोष्टींबाबत सखोल माहिती दिली तसेच त्यांनी फोटोज् व व्हिडिओच्या माध्यमातून प्रात्यक्षिक माहिती दिली. पुढे त्यांनी जी. एम. पी., रेगुलेटरी अँथॉरिटी बद्दल माहिती सांगितली. सदाफुले यांनी विद्यार्थ्यांना प्रश्न विचारून त्यांच्याशी मनमोकळेपणाने संवाद साधला तसेच विद्यार्थ्यांच्या प्रश्नांची उत्तरेही दिली. यावेळी विद्यार्थ्यांना करिअर विषयी असणाऱ्या अनेक प्रश्नांनाही समाधानकारक उत्तरे लाभली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर प्रा. प्रदीप जाधव यांनी केले तर डिप्लोमा फार्मसी विभागाचे प्रमुख डॉ. जितेंद्र कंदले यांनी आभार मानले.

काम असल्याचे सांगत घरातून गेलेले बाप-लेक परतले नाही

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

सोलापूर, (प्रतिनिधी) : वडिल व मुलगा राहत्या घरातून काम आहे म्हणून सांगून गेलेले अद्यापपर्यंत परत आले नाही.मुलगा समर्थ नागेश धर्माधिकारी (वय-२१) व वडील नागेश शंकर धर्माधिकारी (वय-५४,रा.दुसरा मजला हरिप्रसाद अपार्टमेंट शुक्रवार पेठ) असे अपहरीतांचे नावे आहेत. या दोघांचे फोन देखील बंद लागत असल्याने त्या दोघांना कोणीतरी अज्ञात कारणावरून अज्ञात इसमांनी पळवून नेल्याची फिर्याद काळम्मा ऊर्फ स्नेहा नागेश धर्माधिकारी (वय-५०,रा.शुक्रवार पेठ) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात इस्माविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.ही घटना २१ सप्टेंबर रोजी सायंकाळी सात वाजण्याच्या दरम्यान घडली. पुढील तपास दुपोनि. देशमुख हे करीत आहेत.

थोडक्यात

पोलीस दलातील हवालदार योगेश पाटोळे यांचा प्रामाणिकपणा

शिर्डी /संजय महाजन : दिनांक १४/०९/२०२४ रोजी व्ही आय पी गेट वर पोलीस बंदोबस्त करिता असणारे मंदिर सुरक्षा चे नाशिक ग्रामीण पोलीस दलातील हवालदार श्री योगेश पाटोळे यांना एक लेडीज पर्स सापडली होती. पर्स मध्ये ३९५०/- रुपये सापडले ते पैसे त्यांनी संरक्षण ऑफिसमध्ये जमा केले. VIP गेट नंबर दोन येथे सापडलेली पर्स महिला साई भक्त भूमिका प्रतीक राठोड रा. कांदिवली वेस्ट मुंबई यांची असल्याचे समजल्याने ओळख पटवून ३९५० रुपये परत केले. आज रोजी प्रामाणिक पोलीस हवालदार श्री. योगेश पाटोळे यांचा यथोचित सत्कार केला. पोलीस म्हणजे अप्रामाणिक, नकारात्मक हीच बाजू कायम समाजाने पाहिलेली असते. परंतु आजही मोठ्या प्रमाणावर प्रामाणिक आणि आपल्या वर्दीशी इमान असणारे पोलीस आहेत. याची प्रचिती येत असते.हवलदार योगेश पाटोळे यांचा प्रामाणिक पणामुळे साई संस्थान एम्प्लॉईज सोसायटीचे चेअरमन विठ्ठलराव पवार यांनी अभिनंदन केले.

राष्ट्रीय लोकअदालतीचे २८ सप्टेंबरला आयोजन

सोलापूर (जिमाका) : महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांचे निर्देशाप्रमाणे दि. २८ सप्टेंबर २०२४ रोजी सोलापूर महानगरपालिकेच्या आवारात राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. सदर लोकन्यायालयामध्ये प्रामुख्याने सोलापूर महानगरपालिकेचे मिळकत कर तसेच भूमी व मालमत्ता विभागाची प्रकरणे ठेवण्यात आली आहे. सदर लोकन्यायालयामध्ये सोलापूर महानगरपालिकेकडून थकीत मिळकत करावरील दंड/शास्ती यामध्ये ५० टक्के पर्यंत सुट देण्यात येणार आहे. नागरिकांच्या सोईसाठी मिळकत कर, भूमी व मालमत्ता विभागाशी संबंधीत प्रकरणासाठी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. तरी सदर सवलतीचा फायदा नागरीकांनी घ्यावा असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूर व सोलापूर महानगरपालिका यांच्या वतीने करण्यात आले आहे.

अवैध वाळू वाहतूकीवर महसूल प्रशासनाची कारवाई

तहसिलदार सचिन लंगुटे यांची माहिती; ३ ट्रॅक्टर ट्रॉलीसह केले जप्त तर एक होडी केली नष्ट

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर : अवैध वाळू उपसा व वाहतूकी विरोधात पंढरपूरच्या महसूल विभागाने धडक मोहीम हाती घेतली आहे. शेगाव दुमाला येथे भीमा नदीपात्रात महसूल पथकाने अवैध वाळू व वाहतूकीसाठी वापरण्यात येणारे ३ ट्रॅक्टर ट्रॉलीसह जप्त करण्यात आले आहे. तर शिरढोण येथे भीमा नदीपात्रात एक लाकडी होडी नष्ट करण्यात आली असल्याची माहिती तहसिलदार सचिन लंगुटे यांनी दिली.

पंढरपूर तालुक्यातील अवैध वाळू उपसा रोखण्यासह वाळूची अवैध वाहतूक करणार्यांच्या विरोधात कारवाई करण्यासाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद व प्रांताधिकारी सचिन इथापे यांच्या मार्गदर्शनाखाली तहसिलदार सचिन लंगुटे यांनी पथकांची नेमणूक केली आहे. त्यासाठी दररोज रात्री ८.०० ते सकाळी ८.०० वाजेपर्यंत तसेच दिवसा उत्खनन व वाहतुक होत असलेल्या विशिष्ट ठिकाणी धाडी टाकल्या जात आहेत.

realme Shot on realme 7
2024.09.21 16:43

शेगाव दुमाला येथे दि १९ रोजी दुपारी ४.३० च्या सुमारास येथील भिमा नदी पात्रालगत अवैधरित्या वाळु काढण्यासाठी जात असताना तीन ट्रॅक्टर पकडून शासकीय धान्य गोदाम पंढरपूर येथे जमा केले आहेत. सदर वाहनांच्या मालकांवर महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियमातील तरतुदीनुसार दंडात्मक कारवाई करण्याची कार्यवाही सुरु आहे. ही कारवाई महसुल नायब तहसिलदार, मंडळ अधिकारी तुंगत, तलाठी शेगांव दुमाला, सहाय्यक तलाठी शेगांव दुमाला, पोलीस कर्मचारी, कोतवाल व पोलीस पाटील यांनी केली आहे.

तर दुसर्या घटेनेत दि. २१ रोजी दुपारी ४.४५ च्या सुमारास शिरढोण (ता. पंढरपूर) येथील नदीपात्रात अवैधरित्या वाळू उपसा करणार्या दोन लाकडी होड्या पकडून कटरच्या सहाय्याने कापून नष्ट करण्यात आल्या आहेत. ही कारवाई मंडळ अधिकारी पंढरपूर, तलाठी शिरढोण, तलाठी पंढरपूर व पोलीस कर्मचारी यांच्या मदतीने करण्यात आली आहे.

पत्रकारांना आमचा पत्रकार योजना लागू करा : सुभाष घोडके

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

कळंब :सुधाकर रणदिवे, महाराष्ट्र राज्यातील पत्रकार, संपादक, उपसंपादक, यांना मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेप्रमाणे आमचा पत्रकार योजना देऊन विमा संरक्षण देण्यात यावे अशी मागणी ऑल इंडिया संपादक संघाचे धाराशिव जिल्हाध्यक्ष सुभाष द घोडके यांनी राज्यपालाकडे निवेदनाद्वारे केली आहे.

धाराशिव जिल्हाधिकारी यांच्यामार्फत दि. २० सप्टेंबर २०२४ रोजी राज्यपालांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, महाराष्ट्र राज्यातील दैनिक, साप्ताहिक, पाक्षिक, मासिक, आदी सर्व प्रकारच्या प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी, वार्ताहार, छायाचित्रकार, वृत्तपत्र विक्रेते, उपसंपादक,आणि संपादक, यांना मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेप्रमाणे प्रति महा दहा हजार रुपये मानधन विना अठ देऊन त्यांना विमा संरक्षण द्यावे, पत्रकार हा लोकशाहीचा चौथा स्तंभ असला तरी त्यांना ठराविक वेतन मिळत नाही तरीही विविध प्रकारची आंदोलने, निदर्शने, पत्रकार परिषदेतील वार्तांकन करण्यासाठी भटकंती करावी लागते, समाजातील शासन, प्रशासनातील बरे वाईट प्रसंग चव्हाट्यावर आणत असतानाही त्यांच्या आर्थिक कोंडी बरोबरच जीविताचे बरे वाईट झाल्यास कुटुंब उघड्यावर पडते, म्हणून त्यांना प्रतिमाह दहा हजार रुपये मानधन व विमा संरक्षण आमचा पत्रकार म्हणून देण्यात यावे.

शिवसुंदर तरुण मंडळातर्फे राहुल घाटगे दादा यांचा सत्कार

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

टाकळीवाडी/नामदेव निर्मळे : टाकळीवाडी तालुका शिरोळ येथील श्री गुरुदत्त शुगर्स लिमिटेड टाकळीवाडी एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर राहुल घाटगे दादा यांची वेस्ट इंडियन शुगर मिल असोशीयेशन (थखडच)या संस्थेच्या संचालक पदी निवड झाल्याबद्दल शिवसुंदर तरुण मंडळ यांचे संस्थापक श्री लक्ष्मण निर्मळे व मंडळातील सर्व सभासदांच्या वतीने सत्कार करण्यात आला. सत्कार मूर्ती श्री राहुल दादा घाटगे यांना मंडळाच्या वतीने शाल श्रीफळ व सन्मान चिन्ह देऊन गौरवण्यात आले.

शासकीय निवासी शाळा नंगपूरा-मुर्री कबड्डी संघ विजयी

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

गोदिंया : तालुक्यातील नंगपूरा-मुर्री येथील अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळेच्या चमुने वयोगट चौदाचे संघ तालुका कबड्डी खेळात प्रथम क्रमांक पटकवून विजयी झाला. आता हा संघ जिल्हास्तरावर खेळणार आहे.

सदर सांघिक खेळ हे क्रीडा व युवक संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे, जिल्हा क्रीडा अधिकारी अंतर्गत कबड्डी मुले असे खेळ सुरू आहेत. सदर स्पर्धा ही इंदिरा गांधी स्टेडियमच्या पटांगणावर विजयी सामना (दि.२१) दुपारी ०२.०० वाजता दरम्यान झाला. यामध्ये गोदिंया तालुक्यातील कबड्डी वयोगट १४, १७ व १९ असे होते. यामध्ये अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा नंगपूरा-मुर्री या चमुने सहभाग घेऊन वयोगट चौदाचे तालुकास्तरीय कबड्डी प्रथम क्रमांक मिळवून विजयी झाला आहे.

विजयी संघ जिल्ह्यावर खेळणार : तालुकास्तरीय कबड्डी प्रथम क्रमांक

यामध्ये सहभागी विद्यार्थी सागर कोहरे, आदित्य कोकोडे, आदित्य जमदाळ,अनिकेत कोकोडे, आर्यन सोनवणे, विक्रांत टेंभूर्णे, गौरव जमदाळ, धृप लटये तसेच मार्गदर्शक शिक्षक मुन्नाभाई नंदागवळी व कार्तिक सहारे यांनी सराव करून घेतले. मुन्नाभाई नंदागवळी यांनी कबड्डी खेळाचे नवनवीन टिप्स देत, सकाळ सायंकाळी सराव करवून विजय प्राप्त केले.

विजयाच्या यशाबद्दल सहायक आयुक्त विनोद मोहतूरे यांच्या नेतृत्वात शाळेचे मुख्याध्यापक रविशंकर इठूले यांनी अभिनंदन करत शाळेचे शिक्षक प्रदिप ढवळे, नीता भलमे, साधना पारधी, अस्मिता तेलंग, स्वाती राणा, प्रगती खोब्रागडे, अर्चना चव्हाण, तुषार महाजन आदी शाळेतील कर्मचारी व बाह्य स्त्रोत कर्मचारी यांनी अभिनंदन करुन पूढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

श्रीमंत पतसंसंस्थेच्या वतीने पोलीस उपनिरीक्षक शितल वाजे व प्रभारी मुख्याध्यापक रामदास वाजे यांचा सत्कार

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

सिन्नर प्रतिनिधी:- डुबेरे येथील श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे पतसंस्था यांच्या वतीने डुबेरे येथील कन्या शितल त्रंबक वाजे हिची पीएसआय / पोलीस उपनिरीक्षक पदी निवड झाल्याने तसेच येथील जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या प्रभारी मुख्याध्यापक पदी निवड झाल्याबद्दल रामदास वाजे यांचा सत्कार पतसंस्थेचे संस्थापक चेअरमन नारायण शेठ वाजे यांच्या हस्ते करण्यात आला.

श्रीमंत पेशवे पतसंस्था

संघर्षातून मिळालेले यश हे अवर्णनीय असते. काम करत असताना कौटुंबिक समस्याचा विचार करू नका. यापुढे भविष्यात चांगले प्रामाणिकपणे काम करून गावाचे नाव उज्वल करावे असे आव्हान संस्थापक चेअरमन नारायण शेठ वाजे यांनी केले.

फक्रार्यक्रमाचे प्रस्ताविक संस्थेचे व्हा. चेअरमनअरुण शेठ वारुंगसे यांनी केले. यावेळी प्राध्यापक एकनाथ माळी, पोलीस उपनिरीक्षक शितल वाजे ,प्रभारी मुख्याध्यापक रामदास वाजे यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन संस्थेचे व्यवस्थापक अयुब शेख त्यांनी केले .आभार बबनराव वाजे यांनी मानले.

यावेळी संचालक काशिनाथ आप्पा वाजे,दामोदर कुंदे, उद्योजक बबनराव वाजे, गणेश वाजे, म्हसू पवार, पत्रकार सुनील जाधव, धनंजय रेवगडे ,कार्यकारी संचालक महेश कुटे, चेतन वाजे, सोमनाथ गिरी ,गौरी वाजे आदीसह कर्मचारी उपस्थित होते.

हिंदी भाषा ही भारत देशाचा सन्मान : मुन्नाभाई नंदागवळी

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

गोदिंया : हिंदी ही भाषा भारताची राजभाषा असून तीला राष्ट्रीय भाषेचा दर्जा संविधानिकरित्या दिला आहे. हिंदी भाषा ही प्रत्येक भारत वासियांची बोलली जाणारी आत्मसन्मान राखणारी भाषा आहे. हिंदी भाषेमूळे भारतीयांचा गोरव वाढतो आहे. हिंदी भाषीक आणि हिंदी साहित्य या क्षेत्रामुळे भारतातील अनेक साहित्यिक मंडळी ही उंच भरारी घेतल्याचे अनूभूतीस आले. म्हणून हिंदी भाषा ही भारत देशाचा सन्मान आहे. असे प्रतिपादन भाषेचे शिक्षक व मार्गदर्शक मुन्नाभाई नंदागवळी यांनी केले. ते कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते.

याप्रसंगी मंचावर शाळेचे मुख्याध्यापक रविशंकर इठूले यांच्या अध्यक्षतेखाली प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षक नीता भलमे, प्रदिप ढवळे, अस्मिता तेलंग, साधना पारधी, मुन्नाभाई नंदागवळी, कार्तिक सहारे, स्वाती राणा, प्रगती खोब्रागडे, अर्चना चव्हाण व तुषार महाजन आदी मान्यवर उपस्थित होते.

शासकीय निवासी शाळेत हिंदी भाषा व महावाचन स्पर्धा साजरा

यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी हिंदी कवीता सादरीकरण केल्या. हिंदी भाषा दिवसावर आपले मत व्यक्त केले. तसेच शाळेतील अनेक शिक्षकवृदांनी हिंदी भाषेवर विचार मांडले. त्याच प्रमाणे आनंदाचा शनिवार आनंदाची शाळा या उपक्रमांतर्गत महावाचन उपस्थितांनी केले. यामध्ये महापुरुषांचे चरित्र, कथा, कादंबरी तसेच अन्य नवनवीन पुस्तकांचे सामुहिक वाचन घेण्यात आले.

सदर कार्यक्रम शालेय सांस्कृतिक विभागाने आयोजित केले. या कार्यक्रमाचे संचालन अनामिक दुर्योधन याने केले तर आभार सावन जाधव यांनी मानले.

मालकी हक्काच्या जमीनीवरील अतिक्रमण नाही काढल्यास संपूर्ण कुटूंब करणार जलसमधी अंदोलन

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

वागदरी (एस.के.गायकवाड) तुळजापूर तालुक्यातील होर्टी येथील शांताबाई गणा राठोड यांच्या शेतात सौर उर्जा कंपनीने दमदाटी करुण सौर उर्जा युनिट उभे केल्याने व न्याय मिळत नसल्या कारणाने सहकुटूब सामुहीक जलसमधी अंदोलन करणार आहे.

याबाबत प्राप्त माहिती अशी की, तुळजापूर तालुक्यातील होर्टी हलदरा तांडा येथील रहीवाशी शांताबाई गणा राठोड यांची स्वमालकीची होर्टी शिवारात गट नंबर २८५ मध्ये ३ हेक्टर १२ आर इतकी शेतजमीन आहे . याच शेत जमिनीवर संपूर्ण कुटूंबाचा उदरनिर्वाह आहे. त्यांचे जगण्याचे साधन म्हणजे ही जमीन आहे . सदरच्या शेतजमीन होर्टी येथील एक्सेल एम पी. एनर्जी कंपनीने सौर उर्जा प्लॉन्ट अतिक्रमण करून बेकायरेशिर ताबा घेवून सोलार प्लॉन्ट सुरू केले आहे . सदर प्रकरणी संबधीत शांताबाई राठोड यांनी उपविभागीय अधिकारी धाराशिव यांच्याकडे रितसर तक्रार दाखल केली होती.सदर प्रकरणाची सखोल चौकाशी करून या प्रकरणात उपविभागीय अधिकारी यांच्या दालनात सुनवणी होऊन या प्रकरणी दि ३० मार्च २०२२ रोजी शांताबाई राठोड यांच्या बाजुने निकाल देण्यात आला असून सदरच्या निकालावरून संबधीत महसुल विभागाने शेत जमीनीच्या सातबाऱ्यावर व फेरफार नोंदवहीत नाव नोंदवून फेरफार व सात बारा नक्कल शांताबाई यांच्या नावाने दिली आहे.तरी पण संबधीत सौर ऊर्जा कंपनीने बेकायदेशिर अतिक्रमण करून सुरु केलेला प्लान्ट बंद करून माझी जमीन मला परत दयावी म्हणून विनंती केली असता कंपनीने सदर महीला शांताबाई राठोड व त्यांच्या मुलावर नळदुर्ग पोलीस ठाण्यात खोटी तक्रार दाखल करून गुन्हे नोंद करण्यात आले आहे. ते एवढ्यावरच न थांबता बंदुकीचा धाक दाखवून संपूर्ण कुटुबाल जीवंत सोडणार नाही तुम्हाला जीवंत मारू अशी धमकी दिली आहे.या प्रकरणी रितसर सखोल चौकाशी करून माझ्या नावे असलेली शेत जमीन सौर उर्जा कंपनीच्या ताब्यातील व अतिक्रमण केलेली ३ हेक्टर १२ आर इतकी जमीन खुली करून माझ्या ताब्यात द्यावी अन्यथा यासंदर्भात मी माझ्या कुटुबासह दि २४ सप्टेंबर २०२४ रोजी होर्टी येथील साठवण तलावात जलसंमधी अंदोलन करण्याचा इशारा त्यांनी दिलेल्या मा.मुख्यंमत्री साहेब महाराष्ट्र राज्य, उपमुख्यमंत्री साहेब व जिल्हा पोलीस प्रमुख धाराशिव,उपविभागीय आधिकारी धाराशिव , तहसीलदार तुळजापूर व पोलीस ठाणे नळदुर्ग यांना लेखी निवेदनाद्वारे केला आहे. सदर जलसमाधी अंदोलनामध्ये आमच्या जीवाचे काही बरेवाईट झाल्यासं संयधीत जबाबदार राहीतील असे निवेदन कर्त्यानी आपल्या निवेदनात म्हणटले आहे.

ना. रामदास आठवले यांचा जाहीर सत्कार

केंद्रीय राज्य मंत्री रामदास आठवले यांचे प्रतिपादन

वेळ आली तर देईन जान, पण बदलू देणार नाही संविधान

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

रत्नागिरी /प्रतिनिधी : कोकण निसर्ग सौंदर्याने नटलेला आहे. येथे आंबा, काजुसह मासेमारी हे प्रमुख व्यवसाय चालतात. परंतु येथील तरूणांच्या हाताला रोजगार देण्यासाठी येथे उद्योग येणे आवश्यक आहे. देश, राज्याच्या तुलनेत गेल्या ३० ते ३५ वर्षात रत्नागिरी जिल्ह्यात स्ट्रॉसिटीच्या केवळ ३०५ केसेस दाखल झाल्या आहेत. यावरून रत्नागिरीत सामाजिक न्यायाचा सलोखा उत्तम असल्याचे प्रतिपादन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांनी केले. तर 'वेळ आली तर देईन माझी जान, कोणालाही बदलू देणार नाही देशाचे संविधान' या शायरीने ना.रामदास आठवले यांनी भाषणाला सुरूवात केली.

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले)
रत्नागिरी जिल्हा आयोजित
राष्ट्रीय अध्यक्ष - मा. ना. डॉ. रामदासजी आठवले साहेब
(सामाजिक न्याय व अधिकरिता राज्यमंत्री भारत सरकार) यांचा
भव्य सत्कार व जिल्हा मे
RPI

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) यांच्या वतीने ना.रामदास आठवले यांची तिसऱ्यांदा केंद्रीय मंत्रिमंडळात वर्णी लागल्याबद्दल जिल्ह्याच्या वतीने जाहीर सत्कार करण्यात आला. या सत्काराला उत्तर देताना ना.रामदास आठवले बोलत होते. यावेळी विचारमंचावर रिपब्लिकन पक्षाचे रत्नागिरी जिल्हा अध्यक्ष प्रितम ऋके, ज्येष्ठ नेते दादासाहेब मर्चंट, रिपाइंचे राज्य सरचिटणीस गौतम सोनवणे, मुंबई अध्यक्ष सिध्दार्थ कासारे, विवेक पवार, नगरसेवक आदेश मरचंडे, विलास कांबळे आदि मान्यंवर उपस्थित होते.

जिल्ह्याच्या वतीने भव्य पुष्पहार घालून आकर्षक सन्मानचिन्हाने ना. ना.रामदास आठवले यांचा यावेळी सन्मान करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना ना.आठवले म्हणाले, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पक्ष आपण चालवत आहोत.

महाराष्ट्रासहीत देशातील ३५ हून अधिक राज्यांमध्ये आरपीआय सक्रीय आहे. पक्ष छोटा असला तरी माणसं जमतात. मी सत्तेत सहभागी असलो तरी स्थानिक पातळीवर सत्तेचा वाटा मिळत नाही ही वस्तुस्थिती असली तरी बाबासाहेबांचे विचार तळागाळापर्यंत पोहोचविणे हे एकमेव ध्येय आपले आहे. देशातील सर्वसामान्य नागरिक माझ्यासोबत आहेत. म्हणूनच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तब्बल तिसऱ्यांदा आपल्याला मंत्रिपदाची संधी दिल्याचे ना.रामदास आठवले यांनी सांगितले.

आरपीआयमार्फत मी एकमेव राज्यसभेचा खासदार आहे. माझ्या पक्षाला सभागृहात बोलायला कमी वेळ मिळतो म्हणून मी शायरीच्या माध्यमातून कमी शब्दात माझ्या भावना सभागृहात मांडत असतो. काहींना ते पटत नाही. परंतु मला पटते ते मी करतो, असे ना.रामदास आठवले यांनी सांगितले.

आरपीआयच्या माध्यमातून दिल्ली दरबारी बाबासाहेबांचे विचार मांडण्याचे काम आपण करत असतो व मरेपर्यंत मी आरपीआयचे नाव पुसू देणार नाही. अनेकजण पक्ष बदलतात, पक्षांची नावे बदलतात. परंतु ना. रामदास आठवले अखेरपर्यंत आरपीआयमध्येच दिसेल. काँग्रेसकडून संविधान बदलाचा अपप्रचार केला गेला. परंतु बाबासाहेबांनी लिहिलेले संविधान कोणीही बदलणार नसल्याचे ना.रामदास आठवले यांनी स्पष्ट केले.